# देवपूजेपूर्वीची तयारी

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) ‘*’ या चिन्हाने दर्शवली आहेत. )**


– मनोगत ६

– ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील ‘एक विद्वान’ यांनी केलेले भाष्य ७

– ‘सूक्ष्म’ या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ ९

– ग्रंथाच्या निर्मितीच्या वेळी साधक-पुरोहिताला आलेली अनुभूती १०

१. देवपूजेसंबंधीची पंचकर्मे ११

२. देवपूजेची तयारी (अर्थ, महत्त्व, लाभ व क्रम) ११

३. देवपूजेपूर्वीच्या तयारीची प्रत्यक्ष कृती १३

४. देवपूजेपूर्वीच्या तयारीच्या संदर्भातील कृतींमागील शास्त्र १६

४ अ. स्तोत्रपठण किंवा नामजप करणे १६

* स्तोत्रपठण, मंत्रजप व नामजप यांमुळे जिवाभोवती संरक्षककवच निर्माण होणे व वाईट शक्तींची स्पंदने नष्ट होण्यास मदत होणे १६

४ आ. पूजाविधीच्या पूर्वी पूजास्थळाची शुद्धी व पूजेच्या उपकरणांची जागृती करणे १९

४ इ. रांगोळी काढणे २३

* देवतेच्या तत्त्वाशी संबंधित रांगोळी का काढावी ? २४

* रांगोळी काढल्यावर तिच्यावर हळदी-कुंकू का वहावे ? २५

४ ई. शंखनाद २६

* पूजारंभी व आरती करण्यापूर्वी शंख का व कसा वाजवतात ? २६

४ उ. आसनग्रहण ३१

* योग्य व अयोग्य आसने ३२

* पातळीनुसार वापरावयाची आसने ३२

* पूजकाच्या पाटाभोवती रांगोळी काढावी कि काढू नये ? ३४
४ ऊ. आचमन करणे ३४
४ ए. देवतांवरील निर्माल्य काढणे ३६
* निर्माल्य काढतांना ते अंगठा व अनामिका यांनी का उचलावे ? ३६
* निर्माल्य काढल्यानंतर त्याचा वास का घ्यावा ? ४०
* देवतेवरून काढून वास घेतलेले निर्माल्य आपल्या डाव्या बाजूला का ठेवावे ? ४१
४ ऐ. आचमन, प्राणायाम, देशकाल उच्चार, संकल्प व न्यास करणे ४३
* आचमन करतांना पाणी पिण्याचा आवाज का करू नये ? ४४
४ ओ. कलश, शंख, घंटा व दीप यांची पूजा करणे ४८
* कलश, शंख, घंटा व दीप यांची या क्रमाने पूजा का करतात ? ४८
* उपकरणांवर गंध, अक्षता व फूल एकत्रितपणे का वहावे ? ५०
* शंखाला अक्षता का वाहू नयेत ? ५०
* शंखाची पूजा करतांना त्यामध्ये पाणी का भरावे ? ५१
* घंटेच्या पूजेत तुळशीपत्राचा उपयोग का केला जात नाही ? ५१
* दीपपूजन करतांना दीपाला अन्य घटकांबरोबर हळदी-कुंकू का वाहिले जाते ? ५२
४ औ. पूजासाहित्य व पूजास्थळ यांची आणि स्वतःची शुद्धी ५३
४ अं. देवतांच्या मूर्ती व चित्रे यांची स्वच्छता ५४
५. पूजकाने पूजासाहित्याची रचना (मांडणी) स्वतःच्या जवळ करणे का योग्य ? ५७
६. जलद ईश्वरप्राप्तीसाठी केवळ देवपूजा नाही, तर त्यापुढील टप्प्याची साधना करणे आवश्यक ५८
७. देवतांचे विडंबन रोखणे, ही काळानुसार आवश्यक उपासना ! ५९

# मनोगत

नित्य ईश्वरोपासना घडावी यासाठी धर्माने घालून दिलेली एक सोपी आचारपद्धत म्हणजे 'देवपूजा'. देवपूजेमुळे मनात भक्तीभावाचे केंद्र निर्माण होते, देवतेची कृपादृष्टी होते, घरातील वातावरण सात्त्विक बनते, तसेच भावी पिढीवर धार्मिकतेचा संस्कार होण्यासही मदत होते. देवपूजेपूर्वीची तयारी हा देवपूजेचा पाया आहे. देवपूजेपूर्वीच्या तयारीमुळे पूजकाची शुद्धी तर होतेच, शिवाय तो पूजेतून प्रक्षेपित होणारे चैतन्य ग्रहण करण्यास समर्थ बनतो; म्हणूनच देवपूजेची तयारी अत्यावश्यक आहे.

धार्मिक कृती हा एक प्रकारे अध्यात्मशास्त्रातील वैज्ञानिक प्रयोगच असतो. कोणताही प्रयोग करायचा असेल, तर तो नेमक्या पद्धतीने करावा लागतो. धार्मिक कृतीच्या बाबतीतही असेच आहे. योग्य पद्धतीने धार्मिक कृती केली, तरच आपल्याला योग्य फलप्राप्ती होते. त्यासाठी धार्मिक कृतीमागील शास्त्र जाणून घेणेही तेवढेच महत्त्वाचे ठरते. शास्त्र जाणून घेऊन कृती केल्यामुळे श्रद्धेची निर्मिती होते. तसेच 'सत्कर्म जर अशास्त्रीय पद्धतीने केले, तर त्या कर्मामुळे अल्पांशाने का होईना मिळणारे फळ अशास्त्रीय लोकांना मिळते', असे धर्म सांगतो. यासाठी धार्मिक कृती शास्त्रानुसार होणेच आवश्यक ठरते. वरील दृष्टीकोन समोर ठेवून या ग्रंथात देवपूजेपूर्वीची तयारी व तिच्यामागील अध्यात्मशास्त्र यांसंबंधी विवेचन केले आहे.

पूजेपूर्वी स्तोत्रपठण, मंत्रजप व नामजप करण्याचे महत्त्व; पूजास्थळ व उपकरणे यांची शुद्धी; देवतेच्या तत्त्वाशी संबंधित रांगोळी काढणे; देवपूजेला बसण्यासाठी घ्यावयाच्या आसनांचे विविध प्रकार; देवतांवरील निर्माल्य काढण्याची आणि देवतांची चित्रे व मूर्ती पुसण्याची योग्य पद्धत इत्यादी माहितीबरोबरच प्रत्यक्ष पूजेला सुरुवात करण्यापूर्वी आचमन, प्राणायाम, देशकाल उच्चार, संकल्प आणि न्यास करण्याचे आणि कलश, शंख, घंटा अन् दीप यांच्या पूजनाचे महत्त्वही या ग्रंथात सांगितले आहे.

या ग्रंथाच्या वाचनाने पूजेपूर्वीच्या तयारीचे महत्त्व पूजकाच्या लक्षात येऊन त्याच्याकडून ती भावपूर्ण होवो व त्यामुळे त्याला पूजेतून अधिकाधिक चैतन्याची प्राप्ती होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**